# प्रेस नोट दिनांक २५/०३/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

दि. २४/०३/२०१९ रोजी १०.०० वा. दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन येथे एक ५ वर्षाची लहान मुलगी दत्त हॉटेल जवळ, यशवंतनगर, चंदननगर, पुणे येथे रोडवर फिरताना सापडलेने तीला घरचा पत्ता किंवा घरच्यांबाबत काहीएक माहिती सांगता येत नसलेने तेथील नागरीकांनी सदर मुलीस शिवराणा पोलीस चौकी येथे अमंलदार पोलीस हवालदार डांगे यांचे ताब्यात दिले असता,सदर मुलीस पोलीस हवालदार दादाभाऊ डांगे, पोहवा.राऊत, मपोना तृप्ती काळे, पोशि पवार व पोशि शिंदे यांनी पोलीस स्टेशन हददीमधील संपर्कातील नागरीकांचे व्हॅटसअॅप ग्रुपवर सापडलेले लहान मुलीचे फोटो प्रसारीत केले तसेच हददीमध्ये सदर मुलीस सरकारी वाहनातुन घेऊन जावुन नागरीकांना मुलीस दाखवुन ती सोपडलेबाबत सांगितले असता सदरचा मुलगी चौधरी वस्ती, खराडी मधील असलेबाबत माहिती मिळालेने तीची आई नामे सुजाता काळे रा. चौधरीवस्ती, खराडी, पुणे यांचा शोध घेऊन त्यांना मुलगी नामे आरोही काळे वय-५ वर्षे हीस शिवराणा पोलीस चौकी येथे सुखरुप दि.२४/०३/२०१९ रोजी १३/३० वा. ताब्यात दिले असुन वरील कर्मचारी यांचे चांगले कामगिरीबाबत आई सुजाता काळे व नागरीकांनी कौतुक करुन आभार मानले आहे.

सदरची कामगीरी चंदननगर पोलीस स्टेशन कडील दादाभाऊ डांगे, पोहवा सुनिल राऊत, मपोना तृप्ती काळे, पोशि पवार व पोशि शिंदे यांनी केलेली आहे.

